MHAH120010172016 **नि.फौ.ख.क्र. ३६६/२०१६**

**निशाणी क्र. ६६**

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपींचा जबाब –**

आरोपीचे नाव – बाळासाहेब माणिकराव वाघ,
वय – ४५ वर्षे, धंदा – व्यापार,
रा. – कोपरगाव, ता. कोपरगाव, जि.अ.नगर.

प्रश्न क्र. १ आता तुम्हाला विचारण्यात येणा–या प्रश्नांची उत्तरे देणे तुमच्यावर बंधनकारक नाहीत. परंतु, तुम्ही दिलेली सदरची उत्तरे चौकशीकामी वाचण्यात येतील हे तुम्हाला समजले काय ?

उत्तर होय.

प्रश्न क्र. २ **अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ सुभाष बाबराव आव्हाड** यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दि. २४.०१.२०१३ रोजी ते पोलीस नाईक म्हणून कोपरगाव शहर पो.स्टे. ला कार्यरत असतांना मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी मुंबई पोलिस अधिनियम कलम ३७(३) अन्वये शस्त्रात्र व जमावबंदीचा आदेश पारित केला होता, याबद्दल तुम्हास काय सांगावयाचे आहे ?

उत्तर मला माहिती नाही.

प्रश्न क्र. ३ त्याच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, ते पो.स्टे मध्ये कर्तव्यावर हजर असतांना सहा. पोलिस उपनिरीक्षक पवार साहेब यांनी त्यांना व पीएसआय पवार, पो.कॉ. पवार, पो.कॉ. घोरपडे, पो.कॉ. काशिद यांना बोलवून सांगितले की, शिवाजी पुतळा, कोपरगाव येथे बजरंग दल व भारतीय जनता पार्टीच्या लोकांनी जमाव केला आहे व ते मंत्री श्री सुशिलकुमार शिंदे यांच्याबद्दल मुर्दाबाद च्या घोषणा देत असल्याने तेथे जावुन कारवाई करण्यास सांगितले, याबद्दल तुम्हास काय सांगावयाचे आहे ?

उत्तर मला माहिती नाही.

प्रश्न क्र. ४ त्याच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर ते सर्व मोटरसायकलवर सदर ठिकाणी गेले तेव्हा सदर ठिकाणी मा. सुशिलकुमार

शिंदे यांच्या पुतळयाचे दहन केलेले व त्यानंतर तुम्ही सर्वांनी तहसिलदार साहेब, कोपरगाव यांना जावून निवेदन दिले होते, याबद्दल तुम्हास काय सांगावयाचे आहे?

उत्तर हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न क्र. ५ त्याच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदर घटनेबद्दल पो.कॉ. काशिद यांनी तुमच्याविरुध्द फिर्याद नि. ५७ दाखल केली होती, याबद्दल तुम्हास काय सांगावयाचे आहे ?

उत्तर मला माहिती नाही.

प्रश्न क्र. ६ त्याच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांनी न्यायालयासमोर तुम्हा आरोपींना ओळखले आहे, याबद्दल तुम्हास काय सांगावयाचे आहे ?

उत्तर हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न क्र. ७ **अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र.३ संजय पंढरीनाथ घोरपडे** यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दि. २४.०१.२०१३ रोजी ते पो.कॉ म्हणून कोपरगाव शहर पो.स्टे. ला कार्यरत असतांना सदर कालावधीत मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी मुंबई पोलिस अधिनियम कलम ३७-३ अन्वये शस्त्रात्र व जमावबंदीचा आदेश पारित केला होता, याबद्दल तुम्हास काय सांगावयाचे आहे ?

उत्तर माहिती नाही.

प्रश्न क्र. ८ त्याच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदर दिवशी ते पो.स्टे मध्ये कर्तव्यावर हजर असतांना सहा. पोलिस उपनिरीक्षक पवार साहेब यांनी त्यांना व पीएसआय पवार, पो.कॉ. पवार, पोलीस नाईक आव्हाड, पो.कॉ. काशिद यांना बोलवून सांगितले की, शिवाजी पुतळा, कोपरगाव येथे बजरंग दल व भारतीय जनता पार्टीच्या लोकांनी जमाव केला आहे व ते मंत्री श्री सुशिलकुमार शिंदे यांच्याबद्दल मुर्दाबाद च्या घोषणा देत असल्याने तेथे जावुन कारवाई करण्यास सांगितले, याबद्दल तुम्हास काय सांगावयाचे आहे ?

उत्तर माहिती नाही.

प्रश्न क्र. ९ त्याच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर ते सर्वजण मोटरसायकलवर घटनास्थळी गेले तेव्हा सदर ठिकाणी श्री सुशिलकुमार यांच्या प्रतिकात्मक पुतळयाचे दहन करुन त्यानंतर तुम्ही सर्वांनी तहसिलदार साहेब, कोपरगाव यांना जावून निवेदन दिले होते, याबद्दल तुम्हास काय सांगावयाचे आहे?

उत्तर हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न क्र. १० त्याच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदर घटनेबद्दल पो.कॉ. काशिद यांनी सर्व लोकांविरुदध पोलिसात फिर्याद दाखल केली होती, याबद्दल तुम्हास काय सांगावयाचे आहे ?

उत्तर हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न क्र. ११ त्याच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांनी न्यायालयासमोर तुम्हा आरोपींना ओळखले, याबद्दल तुम्हास काय सांगावयाचे आहे ?

उत्तर हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न क्र. १२ उपरोक्त साक्षीदार तुमच्याविरुध्द का सांगतात ?

उत्तर मला सांगता येणार नाही.

प्रश्न क्र. १३ तुम्हाला तुमच्या बचावाकरिता शपथेवर साक्ष द्यायची आहे काय ?

उत्तर नाही.

प्रश्न क्र. १४ तुम्हाला तुमच्या बचावाकरिता साक्षीदार तपासायचे आहेत काय ?

उत्तर नाही.

प्रश्न क्र. १५ तुम्हाला या खटल्याविषयी आणखीन काही सांगावयाचे आहे काय ?

उत्तर राजकिय दबावाखाली माझ्यावर खोटी केस दाखल केली आहे.

समक्ष,

SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR
Digitally signed by SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR
Date: 2026.04.02 17:01:29 +0530

( संजय छ. खैरनार )

दिनांक – ०२.०४.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

आरोपीची सही

**<u>प्रमाणपत्र</u>**

यादवारे प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा जबाब माझ्यासमक्ष नोंदविण्यात आला आणि तो आरोपीने सांगितल्यानुसार बरोबर नोंदविला आहे.

SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR

Digitally signed by SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR
Date: 2026.04.02 17:01:36 +0530

( संजय छ. खैरनार )

दिनांक – ०२.०४.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.